ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal
OPEN ACCESS

VOLUME-X, ISSUE- II MARCH - APRIL 2023

Original Research Article

# प्राथमिक शाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी शाळा व्यवस्थापन समितीतील महिला सदस्यांनी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास

*** प्रा संजय निंबालकर व * * गणेश तुकाराम कुऱ्हाडे,**

** गाईड अँड **रिसर्च स्कॉलर, सेवा सदन अध्यापक विदयालय, उल्हासनगर.*

**प्रस्तावना:**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अस्तित्वात आल्यानंतर देशामध्ये सर्व शाळांमध्ये ६ ते १४ वयोगटातील मूलांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न होउ लागले या कायदयाचा एक भाग म्हणजे शिक्षणाबाबत केंद्र राज्यशासनाबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थांचीदेखील जबाबदारी वाढली आहे. यामध्ये पालक, शाळा, शिक्षक यांच्यावर काही जबाबदा—या निश्चित करण्यात आल्या आहेत.शाळांच्या विकासासाठी दिशादर्शक स्वरुपाची कामे स्थानिक पातळीवर व्हावीत तसेच मुलांचे शिक्षणे अधिक प्रभावी व गतीमान व्हावे याकरीता पालकांचा तसेच महिलाचा सहभाग अनिवार्य केला आहे. कायदयातील कलम २१ प्रमाणे प्रत्येक प्राथमिक शाळेत एक शाळा व्यवस्थापन समिती कार्यरत असेल असे नमूद करण्यात आले आहे.

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

शाळा व्यवस्थापन समितीची स्थापना किंवा रचना करत असताना मुददा क्रमांक ४ नूसार शाळा व्यवस्थापन समितीमध्ये ५० टक्के सदस्य हया महिला असतील म्हणून महिलांचे योगदान हा कायदा अस्तित्वात आल्यापासून वाढले आहे. अशा सर्वच शाळांमध्ये सदय शाळा व्यवस्थापन समितीमध्ये ५० टक्के महिला सदस्य कार्यरत आहे. आणि म्हणून प्राथमिक शाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढीमध्ये शाळा व्यवस्थापन समितीतील महिला सदस्य यांचे प्रयत्न या दृष्टीकोनातून संशोधकाने संशोधन हाती घेतले आहे.

**संशोधनाची उद्‌दीष्टे:**

संशोधनाची उद्‌दीष्टे पुढीलप्रमाणे

१.विदयार्थी गुणवत्ता विकसासाठी महिला सदस्य आयोजित करत असलेल्या कार्यक्रमांचा अभ्यास.

२.शाळा विकासासाठी सामाजिक

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal
OPEN ACCESS
VOLUME-X, ISSUE- II
MARCH - APRIL 2023
Original Research Article

सहभागासाठी महिला करत असलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.

**संशोधनाचे साधन:**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने शाळा व्यवस्थापन समिती, महिला सदस्यासाठी प्रश्नावली हे साधन निश्चित केले आहे.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत विषय हा वर्तमान काळाशी निगडीत असल्याने संशोधकाने प्रस्तुत विषयाच्या अभ्यासासाठी वर्णनात्मक संशोधनपध्दतीचा वापर केला आहे.

**विश्लेषण व अर्थनिर्वाचन:**

प्रश्न क्रमांक १ — प्रवेशोत्सव कार्यक्रमांमध्ये आपण खालीलपैकी कोणाचा सहभाग घेतला.

| पर्याय | महिला मंडळे | सामाजिक कार्यकर्ते | गावकरी | वरील सर्व |
|---|---|---|---|---|
| प्रतिसाद | १६.४% | २१.८% | १०.९% | ५०.९% |

आलेख क्रमांक ०१




**अर्थनिर्वाचन:** आलेख क्रमांक ०१ म्हणजेच शालेय व्यवस्थापन समिती महिला सदस्य हे प्रवेशोत्सव कार्याक्रमामध्ये महिला मंडळाचा १६.५% टक्के, सामाजिक कार्यकर्ते २१.०८%, गावकरी यांचा १०.९%. तर ५०.९% हा वरील तिघांचाही सहभाग घेतात.

न्यादर्श: प्रस्तुत संशोधनात संभाव्य पध्दतीमधील सुगम यादृच्छिक न्यादर्श पध्दतीने निवड केली असून ठाणे जिल्हयातील ५० प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीतील ५० महिला सदस्यांची न्यादर्श म्हणून निवड केली आहे.

**संख्याशास्त्रीय तंत्र:**

संशोधन साधनाद्वारे मिळालेल्या माहितीचे संकलन करुन वावरंवारिता काढून वारंवारितेचे शेकडेवारीवरुन स्तंभालेखाद्वारे अर्थनिर्वाचन व निष्कर्ष काढण्यात आले आहे.

प्रश्न क्रमांक २ — शाळा विकासासाठी आपण खालीलपैकी कोणत्या मार्गाने निधीचे संकलन करतात.

| पर्याय | शासकीय अनुदान | सीएसआर व व्यापारी | दानशुर व्यक्ती | वरील सर्व |
|---|---|---|---|---|
| प्रतिसाद | ३०.९% | ७.३% | ९.१% | ५२.७% |



ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME-X, ISSUE- II

MARCH - APRIL 2023

Original Research Article

**अर्थनिर्वाचन:** आलेख क्रमांक ०२ म्हणजेच शालेय व्यवस्थापन समिती महिला सदस्य हे शाळा विकासासाठी निधीचे संकलन शासकीय अनुदानातून ३०.९% टक्के, सीएसआर व व्यापारी यांच्याकडून ७.३%, दानशुर व्यक्तीकडून ९.१%. तर वरील सर्वाकडून ५२.७% निधीचे संकलन करतात.

प्रश्न क्रमांक ३ ते १०

| प्रश्न | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| होय प्रतिसाद | १००% | ९६.४% | ९८.२% | ९५.२% | ९८.२% | १००% | ९८.२% | १००% |
| नाही प्रतिसाद | ०% | ३.९६% | १.९८% | १.९८% | १.९८% | ०% | १.९८% | ०% |

आलेख क्रमांक ०३




**अर्थनिर्वाचन:** आलेख क्रमांक ०३ नुसार प्रश्न ०३ ते १० चे अर्थनिर्वाचन पुढील प्रमाणे

३ शालेय व्यवस्थापन समितीमधील १०० टक्के महिला सदस्य हे शाळेत अध्ययन अध्यापन साहित्य उपलब्ध करुन देतात.

४. शालेय व्यवस्थापन समितीमधील ९६.४ टक्के महिला सदस्य हे शाळेत भौतिक सुविधा उपलब्ध करुन देतात तर ३.९६ टक्के सदस्य हे शाळेत भौतिक सुविधा उपलब्ध करुन देत नाहीत.

५. शालेय व्यवस्थापन समितीमधील ९८.२ टक्के महिला सदस्य हे शाळेत शालेय गुणवत्त वाढीसाठी तज्ञ मार्गदर्शकांचे

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME-X, ISSUE- II

MARCH - APRIL 2023

Original Research Article

मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करतात तर १.९८ टक्के सदस्य हे महिला सदस्य हे शाळेत शालेय गुणवत्त वाढीसाठी तज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करत नाही.

६. शालेय व्यवस्थापन समितीमधील ९८.२ टक्के महिला सदस्य हे शाळेत मुलांना उत्कष्ट पोषण आहार मिळण्यासाठी प्रयत्न करतात तर १.९८ टक्के शाळेत मुलांना उत्कष्ट पोषण आहार मिळण्यासाठी प्रयत्न करत नाहीत.

७.शालेय व्यवस्थापन समितीमधील ९८.२ टक्के महिला सदस्य हे शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करतात. तर १.९८ टक्के महिला सदस्य हे शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करत नाहीत.

८. शालेय व्यवस्थापन समितीमधील १०० टक्के महिला सदस्य विदयार्थ्यांना येणा—या समस्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्न करतात

९. शालेय व्यवस्थापन समितीमधील ९८.२ टक्के महिला सदस्य विदयार्थी गुणवत्ता वाढीसाठी विविध स्पर्धा परीक्षाचे आयोजन करण्यासाठी प्रोत्साहन देतात. तर १.९८ टक्के महिला सदस्य विदयार्थी गुणवत्ता वाढीसाठी विविध स्पर्धा परीक्षाचे आयोजन करण्यासाठी प्रोत्साहन देत नाहीत.

१०. शालेय व्यवस्थापन समितीमधील १०० टक्के महिला सदस्य दिव्यांग बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात राहण्यासाठी प्रयत्न करतात.

**निष्कर्ष** :

१. बहुतांशी शालेय व्यवस्थापन समितीमधील महिला सदस्यांच्यामते प्रवेशोत्सव कार्यक्रमांत महिला मंडळे, सामाजिक कार्यकर्ते व गावकरी या सर्वाचा सहभाग घेतात.

२. बहुतांशी शालेय व्यवस्थापन समितीमधील महिला सदस्यांच्यामते शालेय विकासाठी शासकीय अनुदान, सीएसआर व व्यापारी तसेच दानशुर व्यक्ती यांच्याकडून निधीचे संकलन करतात.

३. बहुतांशी शालेय व्यवस्थापन समितीमधील महिला सदस्यांच्यामते अध्ययन अध्यापन साहित्य शाळेस उपलब्ध करुन देतात.

४. बहुतांशी शालेय व्यवस्थापन समितीमधील महिला सदस्यांच्यामते शाळेत भौतिक सुविधा उपलब्ध करुन देतात.

५. बहुतांशी शालेय व्यवस्थापन समितीमधील महिला सदस्यांच्यामते शालेय गुणवत्ता वाढीसाठी तज्ञ मार्गदर्शकांच्या मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करतात.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal
OPEN ACCESS
VOLUME-X, ISSUE- II
MARCH - APRIL 2023
Original Research Article

६.बहुतांशी शालेय व्यवस्थापन समितीमधील महिला सदस्यांच्यामते मुलांना उत्कृष्ट शालेय पोषण आहार मिळण्यासाठी प्रयत्न करतात.

७.बहुतांशी शालेय व्यवस्थापन समितीमधील महिला सदस्यांच्यामते शिक्षकांच्या समस्या निराकरण करण्याचाय प्रयत्न करतात.

८.बहुतांशी शालेय व्यवस्थापन समितीमधील महिला सदस्यांच्यामते शालेय विदयार्थ्यांना `णा—या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करतात.

९.बहुतांशी शालेय व्यवस्थापन समितीमधील महिला सदस्यांच्यामते विदयार्थी गुणवत्ता वाढीसाठी विविध स्पर्धा परीक्षाचे आयोजन करतात.

१०. बहुतांशी शालेय व्यवस्थापन समितीमधील महिला सदस्यांच्यामते दिव्यांग बालके शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकून राहण्यासाठी प्रयत्न

**समारोप:**

बांलकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ नुसार प्राथमिक शाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी शाळा व्यवस्थापन समितीतील महिला सदस्या हे योग्य प्रकारे काम करतांनी दिसूनयेत असून शालेय गुणवत्ता वाढीसाठी महिलांचा सहभाग आणखी वाढल्यास बालकांचा सर्वांगीण विकास होण्यासा नक्कीच मोलाची भर पडेल असे संशोधकला नमूद करावेसे वाटते.

**संदर्भसूची:**

१.बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९, महाराष्ट्र शासन.

२.कदम चा.पा. १९८९ शैक्षणिक संशोधन पध्दती, नुतन प्रकाशन, पुणे.

३.भिंताडे वि.रा.१९९९ शैक्षणिक संशोधन पध्दती, नुतन प्रकाशन, पुणे.

४.मुळे रा. व उमाठे वि. तु. १९८७ शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, महाराष्ट्र विदयापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपुर

*Cite This Article:*

** प्रा. निंबालकर स. व ** कुऱ्हाडे .ग ., (2023).* प्राथमिक शाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी शाळा व्यवस्थापन समितीतील महिला सदस्यांनी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास, ***Educreator Research Journal, Volume–X, Issue– II***, *March –April 2023, 271-275.*